ePaper
पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून ईडी-सीबीआयचा गैरवापर नाही: प्रकाश आंबेडकर



वर्ष - 6 । अंक - 282 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दि. 28 जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- ...तर मी माझ्या मिशा काढेन!
- 'परीक्षा पे चर्चा'ला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद!
- इंद्रायणी नदीच्या प्रदूषणात वाढ
- गद्दारांना मतदार जागा दाखवेल!


# लांडगेंचे कौतूक अन् पवारांना आव्हान!

## भाजपाचा राजकीय 'स्ट्रोक' : जिल्ह्याच्या राजकारणाची दिशा फडणवीस बदलणार का?

। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

**पिंपरी-चिंचवडमध्ये "इंद्रायणी थडी-२०२३" महोत्सव उत्साहात सुरू झाला. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी फडणवीस यांच्यासह पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आमदार महेश लांडगे यांच्या उपक्रमांचे तोंडभरुन कौतूक केले.**



इंद्रायणी थडी महोत्सवात भारतीय जनता पार्टीचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, कसबा विधानसभा मतदार संघाच्या दिवंगत आमदार मुक्ता टिळक, मावळ विधानसभा मतदार संघाचे दिवंगत माजी आमदार दिगंबर भेगडे यांच्यासह शिरुर विधानसभा मतदार संघाचे दिवंगत माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांचे अर्धाकृती पुतळे उभारण्यात आले आहेत. हा महोत्सव महिला बचतगट आणि नवोदितांना संधी असा सांस्कृतिक स्वरुपाचा असला, तरी आमदार लांडगे यांची त्यामध्ये संवेदनशीलता आणि सहवेदनाही व्यक्त केली आहे. यासह अयोध्या येथे उभारण्यात येणारे भव्य प्रभू श्रीराम मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली असून, त्याद्वारे भाजपा पक्षाचा "आत्मा" असलेला हा विषय अक्षरश : लक्षवेधी ठरत आहे. भारतीय जनता पार्टीच्या उभारणीमध्ये ज्यांनी योगदान दिले. त्यांचे स्मरण करणारे हे स्मृतीशिल्प भाजपाच्या पक्षनिष्ठेची साक्ष देतात. याबाबत पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आमदार लांडगे यांचे कौतूक केले. त्यांचे संकल्पना आणि कल्पना अत्यंत भव्य-दिव्य असतात. जे करायचे ते दहा हजार, दहा लाख अशा भव्यतेने करतात, अशी शाब्बासकीची थापही दिली. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर दिल्लीतून वाट वाकडी करून महोत्सवाच्या उद्घाटनाला हजेरी लावली. आमदार लांडगे यांचा एकही कार्यक्रम फडणवीस टाळत नाहीत. गेल्या वर्षी लांडगे यांनी भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत भरवली होती. त्यावेळी फडणवीस अक्षरश: बैलगाडा घाटात उतरले. त्यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी "बैल कधी एकटा येत नाही, तर जोडीने येतो..." असा उल्लेख करीत महेश लांडगे यांच्या पाठिशी ठाम असल्याचे जाहीरपणे सांगितले होते. इंद्रायणी थडी महोत्सवाच्या उद्घाटनातही फडणवीस यांनी महेश लांडगे यांनी उभारलेल्या प्रभू श्रीराम मंदिर प्रतिकृतीचे कौतूक केले. छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा, ग्राम संस्कृती, "मराठा साम्राज्याचे शिलेदार" यांच्या आठवणी ताज्या केल्या आहेत.

### पक्ष विस्ताराचा अजेंडा...

विशेष म्हणजे, भाजपाच्या दिवंगत आमदारांच्या कुटुंबियांना निमंत्रित करुन त्यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. हा अत्यंत भावनिक प्रसंग होता. अनेकांच्या डोळ्याच्या कडा ओलावल्या. मावळ लोकसभा संघातील दिगंबर भेगडे यांच्यापासून शिरुर लोकसभा मतदार संघातील बाबुराव पाचर्णे यांच्यापर्यंत आणि पिंपरी-चिंचवड शहरातील लक्ष्मण जगताप यांच्या पासून पुण्यातील मुक्ता टिळक यांच्यापर्यंत म्हणजे पुणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या घराण्यांना आणि त्यांच्या समर्थक विचारांच्या लोकांना आपले करतानाच भाजपा पक्षश्रेष्ठींची कौतूकाची थाप मिळणाऱ्या महेश लांडगे यांच्यावर फडणवीस यांचा वरदहस्त आहे.

### फडणवीस पट्ट्याला ताकद देणार?

दरम्यान, राज्याच्या मंत्रीमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता असून, मंत्रीपदाच्या चर्चेत लांडगे आघाडीवर आहेत. बारामती लोकसभा मतदार संघातील भाजपाच्या प्रभावी दावेदार कांचन कुल आणि त्यांचे पती आमदार राहुल कुल या दोघांनीही इंद्रायणी थडीला हजेरी लावलेली पहायला मिळाली. पुणे जिल्ह्यातील भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना यासह सर्वपक्षीय आजी-माजी लोकप्रतिनिधींनी इंद्रायणी थडीला उपस्थिती दर्शवली आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यात पवारांना आव्हान देण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या "पट्ट्या" ला ताकद देणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# नारीशक्तीची ताकद महेश लांडगे यांच्या पाठिशी!

। पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महिला बचत गटसारखी संकल्पना ज्यातून 'चुल आणि मुल' या संकल्पनेच्या बाहेर येऊन राज्यातील महिला सक्षम होतांना आपल्याला बघायला मिळत आहेत. त्याला बळ देण्याचे काम "इंद्रायणी थडी" यात्रेमधून आमदार महेश लांडगे या भावाने केले. त्यामुळे राज्यातील सर्व मातृशक्ती लांडगे यांच्या पाठीशी आहे, असे गौरोद्गार भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी काढले. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि शिवांजली सखी मंचच्या पुढाकाराने भोसरीतील गावजत्रा मैदानावर सुरू असलेल्या इंद्रायणी "थडी- २०२३" महोत्सवाला चित्रा वाघ यांनी भेट दिली. यावेळी त्या बोलत होत्या.**



शिवांजली सखी मंचच्या अध्यक्षा पुजा लांडगे यांच्याहस्ते त्यांचा प्रभू श्रीराम मूर्ती देवून सन्मान करण्यात आला. चित्रा वाघ म्हणाल्या की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून 'नारी शक्तिचा' सन्मान केला जात आहे. यातच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत "इंद्रायणी थडी" महोत्सवाची सुरूवात झाली. त्याचा मला आनंद होत आहे. या कार्यक्रमात १० लाखांपेक्षा अधिक लोक येऊन गेली आहेत. तसेच, आगामी तीन दिवसांत आणखी गर्दी होणार आहे. तसेच देशातील पंतप्रधान मोदी सरकार आणि राज्यातील शिंदे -फडणवीस सरकार महिलांना सुरक्षित ठेवण्याचे काम करीत आहे. त्यामुळेच या मातृशक्तीचं कौतुक, गौरव करण्याचे काम महेश लांडगे करीत आहेत, असेही चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.

## चित्रा वाघ : महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या "इंद्रायणी थडी" ला भेट

### महेशदादांच्या घरीपण नारीशक्तीचा दबदबा...

नारीशक्तीचा दबदबा सर्वत्र आहे. महेशदादांच्या घरीपण हा दबदबा कायम आहे. "पूर्वी महेशदादा हजार लोकांत उठून दिसत होते. पैलवान भरभक्कम दादाला आमच्या पुजा वहिनींनी डायटिंग करायला लावले आहे. पण, आमचा दादा असाच पैलवान असला पाहिजे..जबरदस्त...म्हणून मला वाटते की, मातृशक्तीचा दबदबा दादांच्या घरापर्यंत पोहोचला आहे." अशी मिष्कील टिपण्णी चित्रा वाघ यांनी केली.

### बचत गटांच्या उत्पादनांचा घेतला आस्वाद...

दरम्यान, रात्री उशीरापर्यंत विविध कार्यक्रमांचा चित्रा वाघ यांनी आनंद घेतला. मनोरंजनाच्या कार्यक्रमस्थळी त्यांनी गीत गायनही केले. तसेच, महोत्सवातील सुमारे ४०० स्टॉलला प्रत्यक्ष भेट दिली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या महिला बचतगटांच्या प्रतिनिधींची आस्थेने विचारपूस केली आहे. यासह स्टॉलवरील उत्पादनाचा आस्वादही घेतला.

# ...तर मी माझ्या मिशा काढेन!

## पिंपरी चिंचवडमध्ये एका खासगी विद्यापीठाच्या कार्यक्रमात गडकरींनी सांगितली धीरूभाई अंबानींसोबतची एक आठवण



।पुणे। महाईन्यूज। प्रतिनिधी।

केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी प्रसिद्ध उद्योगपती दिवंगत धीरुभाई अंबानी यांच्याबद्दलची एक आठवण सांगितली आहे. नितीन गडकरी यांनी धीरुभाई अंबानी यांच्याबरोबर एक पैज लावली होती. “ती पैज हरलो तर मी माझ्या मिशा काढून टाकेन”, असा शब्द गडकरींनी अंबांनींना दिला होता. पिंपरी चिंचवडमध्ये एका खासगी विद्यापीठाच्या कार्यक्रमात गडकरींनी सांगितलेला हा किस्सा चांगलाच चर्चेत आला आहे.

मुंबई द्रुतगती महामार्गाच्या निविदे प्रक्रियेमुळे धीरूभाई अंबानी हे नितीन गडकरी यांच्यावर नाराज झाले होते. ३६०० करोड रुपयांची निविदा असताना गडकरी यांनी ती निविदा प्रक्रिया रद्द केली होती. यामुळे नाराज झालेल्या अंबानी यांनी १८०० करोड रुपयांमध्ये तुम्ही महामार्ग बनवू शकत नाही असे म्हणत सुनावले होते. नितीन गडकरींनी देखील मी हा रोड तेवढ्यात पैशांमध्ये बनवून दाखवणारच तसे न झाल्यास मी माझ्या मिशा कापेन असे आव्हान गडकरींनी धीरुभाई यांना दिले होते. मात्र, द्रुतगती मार्ग अवघ्या दोन वर्षात तो ही अवघ्या सोळाशे करोड रुपयात बनवून दाखवला. धीरूभाई अंबानी यांनी मी हरलो तुम्ही जिंकलात असे मान्य केले होते.

### अंबानींसोबतची एक आठवण ...

**गडकरी म्हणाले की, मला पुणे शहराने खूप काही शिकवले. मी महाराष्ट्रात मंत्री होतो. पुणे- मुंबई द्रुतगती मार्ग बनवण्याचे सौभाग्य मला मिळाले. धीरूभाई अंबानींनी द्रुतगती मार्गाचे काम मिळावे म्हणून सगळ्यात कमी ३६०० करोड ची निविदा काढली होती. नियमानुसार ते निविदा त्यांना मिळायला हवी होती. १८०० करोडमध्ये होणारे काम आहे ३६०० करोड जास्त होतात. असे मला वाटत होते. बाळासाहेब ठाकरे आणि प्रमोद महाजन तेव्हा मला म्हणाले होते. त्यांना नियमानुसार काम द्यायला हवं. धीरूभाई यांच्या त्या निविदेवर मी सही न केल्याने ती रद्द झाली. यामुळे धीरूभाई अंबानी नाराज झाले होते. निविदा कमी असताना नियमानुसार आम्हाला काम मिळायला हवे होते. तरीही तुम्ही आमचे टेंडर रद्द केले. अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली. ते मला बरेच काही बोलले. ते म्हणाले की तुम्ही हा रोड कमी पैशांमध्ये बनवू शकत नाहीत. मी ही म्हणालो जर मी रोड बनवला नाही तर मिशा कापेल. तो रोड दोन वर्षात बनवला तर तुम्ही काय कराल. असे मी म्हणालो पण ते तिथून निघून गेले. पुढे मी MSRDC ची स्थापना केली आणि रोड च काम सुरू केले. दोन वर्षात द्रुतगती मार्ग बनवला. तो ही १६०० करोड रुपयात झाला. कालांतराने धीरूभाई यांनी मला बोलवून घेतले आणि मी हरलो तू तुम्ही जिंकलात असे धीरूभाई यांनी मान्य केले होते. अशी आठवण नितिन गडकरी यांनी सांगितली.**

## पीएमआरडीएकडून वाघोलीतील अनधिकृत बांधकामांवर हातोडा

।नारायणगाव । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पुणे मेट्रोपोलिटन रिजन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी - पीएमआरडीए) हवेली तालुक्यातील वाघोली येथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली. त्यामध्ये वाणिज्य स्वरूपाचे बांधकाम आणि ५०० फूट भिंत पाडण्यात आली.

हवेली तालुक्यातील मौजे वाघोली गट क्रमांक ६४६ या ठिकाणी पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाकडून वाणिज्य स्वरूपाचे सुमारे ५०० चौरस फूटांचे बांधकाम तसेच ५०० फूट लांब अनधिकृत भिंतीचे बांधकाम पाडण्यात आले आणि वहिवाटीचा रस्ता मोकळा करून देण्यात आला. या वाणिज्य स्वरूपाचे बांधकाम पीएमआरडीएने दिलेल्या मूळ मंजुरी व्यतिरिक्त मोकळ्या जागेत अनधिकृतपणे वाढीव बांधकाम करण्यात आले होते. तीन पोकलेनच्या साहाय्याने हे बांधकाम पाडण्यात आले. ही कारवाई करताना पीएमआरडीएचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. तसेच स्थानिक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पीएमआरडीए क्षेत्रात कोणतेही बांधकाम करताना आवश्यक परवानग्या घेऊनच करावे, असे आवाहन पीएमआरडीएकडून करण्यात आले आहे. या अनधिकृत बांधकामधारकांकडून बांधकाम पाडकामाचा खर्च वसूल केला जाणार आहे, असेही पीएमआरडीएकडून सांगण्यात आले.



## शॉर्ट न्यूज

### पुणे ग्रामीण भागातील सीएनजी पंप बेमुदत बंद

**पुणे** : पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील ४२ सीएनजी पंप चालकांना गुजरातमधील टोरेंट गॅस कंपनी सीएनजीचा पुरवठा करते. मात्र, शासनाने मंजूर केलेले कमिशन देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याने शुक्रवारपासून (२७ जानेवारी) हे पंप चालक बेमुदत बंद ठेवण्यात आले आहेत. परिणामी पुणे जिल्ह्यात सीएनजी वर चालणाऱ्या वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागणार आहे. केंद्र शासनाने सीएनजी वितरकांसाठी वाढीव सेवामूल्य (कमिशन) जाहीर केले आहे. पुणे शहराला सीएनजी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने वाढीव सेवामूल्य विक्रेत्यांना दिले. मात्र, ग्रामीण भागात पुरवठा करणाऱ्या टॉरेंट कंपनी व्यवस्थापन देण्यास टाळाटाळ करत आहे. याबाबत यापूर्वीही विक्रेत्यांनी संप पुकारला होता.

# पिंपरी चिंचवडमध्ये ईडीची छापेमारी, ४०० कोटींचा घोटाळ्या प्रकरणात कारवाई

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अंमलबजावणी संचालनालयाने पुणे जिल्ह्यात छापेमारी सुरु केली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज वाटप केल्याप्रकरणी ही कारवाई सुरु आहे. पिंपरी चिंचवडमधील सेवा विकास बँकेचे माजी अध्यक्ष अमर मूलचंदानी यांच्याकडे छापेमारी करण्यात आली आहे.

त्यांच्यांशी संबंधित काही ठिकाणांवर ईडीचे पथक कारवाई करत आहे. सेवा विकास सहकारी बँकेच्या संचालकांनी कर्जाचे १२४ बनावट प्रस्ताव मंजूर केले होते. या प्रकरणात जवळपास ४३०



कोटी रुपये विविध व्यक्ती व संस्थांना नियमबाह्य पद्धतीने वितरित केले. ज्या व्यक्तींची कर्ज मिळण्याची पात्रता नव्हती, त्यांना कर्ज दिले गेले. कर्ज देताना परतफेडीची क्षमता व अन्य निकष तपासले नाही.

यामुळे बँकेचे मोठे नुकसान झाले. सहकार सहआयुक्त राजेश जाधवर यांनी २०२० मध्ये या कर्जांविषयीचे ऑडिट केले होते. त्यानंतर हे घोटाळे उघडकीस आले.

### सेवा विकास बँकेचा घोटाळा : कर्ज देताना परतफेडीची क्षमता व तपासले नाही अन्य निकष

### नुकतेच आले होते जामिनावर बाहेर

**अटकेत असलेले अमर मूलचंदानी काही महिन्यांपूर्वी जामिनावर बाहेर आले. त्यानंतर आज ईडीने छापा टाकला. बँकेवर आरबीआयने प्रशासक नेमला आहे. या बँकेत हजारो ठेविदारांचा कोट्यवधींचा पैसा अडकून आहे.**

### आयुक्त कृष्ण प्रकाश आले होते अडचणीत

**पिंपरी-चिंचवडमध्ये माजी पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश हे सेवा विकास बँक प्रकरणात अडचणीत आले होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक डोंगरे यांच्या नावाने मुख्यमंत्र्यांनाच त्यांच्यासंदर्भात पत्र लिहिले होते. त्यात सेवा विकास बँक घोटाळा प्रकरणात संचालकांना अटक करण्याचे आदेश असताना त्यांनी अटक केली नाही. त्यासाठी त्यांनी साडेतीन कोटी रुपये घेतले होते, असा आरोप करण्यात आला होता.**

या प्रकरणात पिंपरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. त्यावेळी अमर मूलचंद यांच्यासह पाच जणांना अटक केली होती.

# 'परीक्षा पे चर्चा'ला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद!

## » पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मार्गदर्शन : आमदार लांडगे यांच्या पुढाकाराने 'लाईव्ह'

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभरात सुरू करण्यात आलेला 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमाचे भोसरीत लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. यामध्ये परिसरातील ३४ शाळांतील सुमारे ८ हजार विद्यार्थी- पालकांनी सहभाग घेतला. नवी दिल्ली येथील तालकटोरा इंडोर स्टेडियमवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना परीक्षा विषयी असलेल्या अडीअडचणींवर समस्यांवर मार्गदर्शन करण्याबाबत 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमाचे आयोजन केले.**

त्यात देशभरातील सुमारे ३८ लाख विध्यार्थी-पालकांनी सहभाग घेतला. पिंपरी-चिंचवडसह भोसरी परिसरातील विद्यार्थी- पालक आणि शाळांना एकाच ठिकाणी 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमात सहभागी होता यावे. याकरिता आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने नियोजन करण्यात आले होते.

त्यासाठी मोठा एलईडी स्क्रीन आणि आसन व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये एसपीजी इंग्लिश मिडिअम स्कूल, अमृता विद्यालय, यमुनानगर, निगडी, मॉर्डन विद्यालय, निगडी, टागोर विद्यालय, स्वामी समर्थ मराठी माध्यम शाळा, समता विद्यालय, स्वामी समर्थ सेमी इंग्रजी स्कूल, स्वामी समर्थ इंग्लिश व सीबीएसई बोर्ड, इंद्रायणीनगर, भोसरी कन्या विद्यालय, शिव छत्रपती विद्यालय, प्रियदर्शनी इंग्रजी माध्यम व सीबीएसई बोर्डाचे विद्यार्थी, एसपी इंटरनॅशनल, प्रियदर्शनी स्टेट बोर्डचे विद्यार्थी, एसपीएस इंटरनॅशनल स्कूल, संत साई स्कूल, श्रीराम विद्यालय, श्रीराम विद्यालय, गायत्री इंग्लिश मीडिअम, प्रीतम प्रकाश महाविद्यालय, ज्ञान सागर विद्यालय, एसएनजी इंग्लिश स्कूल आदी विविध शाळांमधील विद्यार्थी, पालकांनी सहभाग घेतला, अशी माहिती राज्य पदवीधर शिक्षक संघटनेचे सचिव मनोज मराठे यांनी दिली.



> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. 'परीक्षा पे चर्चा' हे एक चर्चा सत्र आहे. ज्यात विद्यार्थी-शिक्षक-पालक आपल्या शैक्षणिक अडचणी पंतप्रधान यांच्यासमोर मांडु शकतात. त्यावर कुठलाही प्रश्न विचारू शकतात. पिंपरी-चिंचवडमध्ये पहिल्यांदाच असा मोठा कार्यक्रम झाला. ज्यातील सुमारे ८ हजार विद्यार्थी सहभागी झाले.
>
> - मनोज मराठे, सचिव, महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्र प्रमुख संघटना.



> भोसरीसह पिंपरी-चिंचवड परिसरातील विद्यार्थी-पालक आणि शिक्षकांना एकाच ठिकाणी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात सहभागी होता यावे याकरिता आम्ही आसन व्यवस्था आणि लाईव्हची व्यवस्था केली. भाजपाचे पदाधिकारी आणि शिक्षकांच्या सहकाऱ्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे थेट विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होत आहे. परीक्षा काळातील तणाव व्यवस्थापन, अडचणी याबाबत मार्गदर्शन मिळते. "कुटुंबांना आपल्या मुलांकडून अपेक्षा असणे स्वाभाविक आहे, परंतु केवळ सामाजिक प्रतिष्ठा टिकवण्यासाठी असेल तर ते धोकादायक ठरते." हा कानमंत्र आज पंतप्रधानांनी देशवासीयांना दिला आहे.
>
> - महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# इंद्रायणी नदीच्या प्रदूषणात वाढ

## » फेसयुक्त पाणी : सिद्धबेट बंधाऱ्यानजीक पसरली दुर्गंधी...

।पिंपरी चिंचवड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**आळंदी येथे इंद्रायणी नदी पात्रामध्ये सद्या मोठ्या प्रमाणात फेसयुक्त पाणी येत आहे. यामुळे सिद्धबेट बंधाऱ्या नजीक दुर्गंधी पसरली आहे. पिंपरी-चिंचवडच्या कुदळवाडी भागातील कंपन्यामधून निघणारे केमिकल मिश्रीत पाणी इंद्रायणी नदीत मिसळत आहे. यामुळे प्रदूषणात भीषण वाढ झाली आहे. या सर्व प्रकाराकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. गेले आठ दिवसांपासून नदीला फेसयुक्त पाणी आले आहे.**



या फेसाचे डोंगर झाले असून आळंदीत जणू स्वित्झर्लंड अवतरले आहे की काय? असे चित्र आहे. या फेसयुक्त पाण्यामुळे आळंदीकरांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या इंद्रायणीची पाणी पातळी चांगली आहे. यातूनच शेतीसाठी पाण्याचा वापर होत आहेता.

शेतात देखील हेच फेसयुक्त पाणी वाहताना दिसून येतंय. नदीत फक्त सांडपाणीच वाहत आहे. या पाण्याबरोबर जलपर्णी देखील वाहून येत असून संत ज्ञानेश्वर मंदिर जुन्या बंधाऱ्या नजीक मोठ्या प्रमाणात जलपर्णीचा ढीग साचला आहे.

नागरी आरोग्याच्या तक्रारी... आळंदी शहराच्या मध्यवर्ती भागातील पात्रामध्येच सांडपाणी, जलपर्णी साचल्याने इंद्रायणी नगर, गोपाळ पुरा भागात डासांचा उपद्रव वाढला आहे.

दरम्यान इंद्रायणी प्रदूषणाचे वाढते प्रमाण चिंताजनक असून गेल्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे अगोदरच आरोग्य व आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांना नदी प्रदूषणामुळे आरोग्याच्या तक्रारीचा सामना करावा लागत आहे.

# भोंदू बाबांवरची टीका धर्मावर हल्ला कसा?




**गेली दहाबारा दिवस आपल्या देशातील माध्यमांवर केवळ एकाच विषयावर चर्चा सुरु आहे. मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील बागेश्वर धाम येथील तरुण प्रवचनकार धीरेंद्र शास्त्री महाराज याना नागपुरात अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दिलेल्या आव्हानावर सारे रान पेटले आहे. धीरेंद्र शास्त्री याना हनुमान प्रसन्न असून त्या आधारावर ते लोकांच्या जीवनातील अडचणी सोडवतात आणि भविष्य सांगतात असा त्यांचा दावा श्याम मानव यांनी खोडन काढत ही कथित दिव्यशक्ती सिद्ध करून दाखवा असे आव्हान दिले आहे. खरंतर हे आव्हान एका व्यक्तीला दिले असताना श्याम मानव किंवा अंनिस आमच्या धर्माला आव्हान देत असल्याचा आभास निर्माण करून व्यक्तिगत वादाला भक्त सार्वजनिक करून धर्माला त्यात ओढत असल्याचे जाणवत आहे. आता जणू धीरेंद्र शास्त्री हेच एकमेव धर्माचे तारणहार राहिले आहेत असे समजून भक्त आकांडतांडव करीत आहेत तो अनाठायी वाटतो.**



कोणत्याही धर्माच्या बुवा,बाबावर अंनिसने आरोप केला किंवा सत्याचा आरसा दाखविण्याचा प्रयत्न केला की बाबा आणि त्यांचा भक्त समुदाय खवळून उठतो. सत्य शोधणाऱ्यांना फक्त आमचाच धर्म दिसतो का ? हिम्मत असेल तर इतर धर्माच्या बाबांवर बोला. इसाई.मुस्लिम धर्मात सुरु असलेल्या अंधश्रद्धा तुम्हाला दिसत नाहीत काय ? असल्या ठेवणीतल्या आरोपांची सरबत्ती सुरु होते. बुवाबाजी,चमत्काराचे किंवा दिव्यशक्तीचे दावे करा आणि गर्दी जमवा असे काही कोणताही धर्म किंवा धर्मपरिषद अशा बाबाना सांगत नसते मात्र दावे केल्यावर अडचणीत आल्यावर सगळ्या बुवा, बाबाना ढाल म्हणून हमखास धर्माचा वापर करावासा वाटतो. धीरेंद्र शास्त्री महाराज यांच्या बाबत तेच होताना दिसत आहे. मुळात अंनिसने नागपुरात ख्रिचन मिशनरी किंवा मुस्लिम बाबांवर केलेली कारवाई समर्थकांना अशावेळी दिसत नसते. कांगावा धर्म रक्षणाचा केला की त्याच्या पदरात चुकीची कामे झाकण्याचा हा प्रयत्न असतो.

राष्ट्रीय स्तरावर मीडियाला या निमित्याने मोठा विषय मिळाला असल्याने तो विषय मीडिया चघळणार हे ओघाने येणे स्वाभाविक आहे , ज्या विषयाचे लोकांना कुतूहल असते त्या विषयावर कार्यक्रम सादर केले जातात यात व्यावसायिक गणित लपलेले असते. मुळात धीरेंद्र महाराज याना श्याम मानव यांनी सोपे आव्हान दिले आहे. भक्तांचा अर्ज बोलावून तुम्ही भविष्य सांगत आहात ना मग केवळ फसवणूमुक्त स्थितीत हेच भविष्य कथन करा ,ते नव्वद टक्के जरी खरे ठरले तरी आम्ही ३० लाखांचे बक्षीस देऊन चळवळ बंद करू. महाराजांना या निमित्याने उत्तम संधी होती त्यांनी एकदाची दिव्यशक्ती दाखवून मानव आणि अंनिस चळवळीचे तोंड बंद करायला हवे होते. प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही कारण या जगात कोणत्याही व्यक्तीकडे दैवीशक्ती नसते हे या महाराजांना माहित आहे. आजवर ज्यांनी असे दावे केले आहेत ते सगळे पराभूत झाल्याचा जगाचा इतिहास आहे.

कोणत्याही बुवा, बाबांचा भक्त परिवार प्रामाणिक असतो. धार्मिक संस्कारात वाढलेले भक्त बाबांशी एवढे एकरूप होतात की त्यांना त्यांची कोणतीही सामान्य कृती हा आपल्या धर्माचा किंवा धर्म कार्याचा भाग वाटायला लागतो. सगळे बुवा बाबा कीर्तन,प्रवचन किंवा कथेत मूळ कथा ६० टक्के सांगून भक्तांच्या मेंदूत जे टाकायचे असते ते ४० टक्के टाकण्याचा बेमालूम प्रयत्न करीत असतात. कोणताही बुवा,बाबा स्वतःचे मूळ संस्थान आणि पंथांचा प्रचार कसा आणि किती करायचा यात चाणाक्ष असतो हे करताना पदोपदी आपण हे धर्माच्या रक्षणासाठी करीत असल्याची पेरणी करीत असतो त्यामुळे बाबांवर आघात म्हणजे थेट धर्मावर आघात असे समीकरण तयार करण्यात हे लोक यशस्वी झालेले असतात ,सामान्य भक्तांना हे षडयंत्र कळत नाही. देशभर पसरलेल्या बागेश्वर समर्थकांनाही हे आव्हान म्हणजे सनातन धर्माला दिलेले आव्हान वाटते तेच मुळात चुकीचे आहे.

मुळात सनातन हिंदुधर्म एवढा नाजूक किंवा कमजोर नाही की कुणाच्या आव्हानाने कमजोर होईल किंवा संपून जाईल. असे जर असेल तर कोणत्याही बुवा, बाबांच्या भक्त परिवाराने सनातन धर्माची काळजी करण्याचे कारण नाही. जो धर्म शेकडो आक्रमणाच्या कसोटीतून सहीसलामत बाहेर पडला आणि आणखी मजबूत झाला तो कुणाच्या आरोपांनी किंवा आव्हानाने तसूभरही प्रभावित होणार नाही याची भक्तांनी खात्री बाळगायला हरकत नाही त्यामुळे उगीच आकांडतांडव नका करू . समाज सुधारकांना त्यांचे काम करू द्या तुम्ही शान्त बसून काय होते ते बघा. आजकाल कुणीही बाबा उठतो आणि आपणच जणू धर्माचे कैवारी असल्यासारखे वागायला लागतो. जे खरा धर्माचा कैवार घेतात त्यांना अशाघटनांनी मोठी मजा वाटत असते. खुद्द शंकराचार्य जर बागेश्वर बाबांच्या चमत्कारावर सवाल करीत असतील तर त्यांना भक्त कोणत्या धर्माशी जोडतील हेही जाहीर करायला हवे.

## संपादकीय »

# व्यथा अभिव्यक्तीची!

***आधुनिक जगात वावरताना माहितीच्या प्रसाराचे योग्य ते नियमन आवश्यक असते. पण असे नियमन करणे म्हणजे सरकारच्या हातात नवे अस्त्र देणे नव्हे.***

भारतीय प्रजासत्ताकाचे मर्म आणि महत्त्व समजून घेण्या-देण्यासाठी सर्वात उत्तम काळ हा सांप्रत काळ आहे, असे म्हणावे लागेल. याचे कारण राज्यघटनेच्या माध्यमातून जी मूल्ये आपण स्वीकारली, त्यांच्या प्रकाशात आत्मपरीक्षण करावे, अशा अनेक गोष्टी आणि आव्हाने आज आपल्या पुढ्यात आहेत. सात दशकांहून अधिक काळ या देशातील सर्वसामान्य जनता आपले राज्यकर्ते निवडत आली आहे. अशा प्रकारचे रक्तहीन, शांततापूर्ण सत्तांतर ही लोकशाहीची केवढी मोठी देन आहे! भारताच्या शेजारी देशातील स्थिती पाहिली तर कुठे लष्करशाही, कुठे सर्वंकष नियंत्रणाची व्यवस्था, तर कुठे एकाधिकारशाही दिसते. यापैकी अनेक देशांत निवडणुका होतातही. परंतु केवळ निवडणुका म्हणजे लोकशाही नव्हे. तो सांगाडा आहे. त्यात सर्वसामान्य व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा, सर्वांना समान संधीचा, संस्थांच्या स्वायत्ततेचा, मोकळ्या अभिव्यक्तीचा प्राण ओतला नसेल तर ती तोंडदेखली लोकशाही ठरते.

## करार झाले; प्रत्यक्ष गुंतवणूक कधी?

**दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेची वार्षिक बैठक सालाबादप्रमाणे पार पडली. जगावर मंदीचे सावट असताना उद्योग जगताने वास्तववादी भूमिका घ्यावी, असे आवाहन जागतिक नेत्यांनी परिषदेच्या व्यासपीठावरून केले.**

दावोस परिषदेत भारत कुठे होता, असा प्रश्न नेहमीच उपस्थित केला जातो. रशिया- युक्रेन युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला असताना भारताची अर्थव्यवस्था मजबूत असल्याचा संदेश या परिषदेतून भारत सरकारच्या वतीने देण्यात आला. दावोसमध्ये नेहमीप्रमाणे महाराष्ट्र सरकार सहभागी झाले होते. राज्य सरकारने खास दालन उभारले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राज्यात गुंतवणूक वाढावी यासाठी प्रयत्न केले. राज्यात सुमारे १ लाख ५० हजार कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे व उद्योगमंत्री सामंत यांनी दिली. आतापर्यंत दावोसमध्ये झालेले सर्वाधिक करार असल्याचा दावाही करण्यात आला. गेल्या वर्षी महाविकास आघाडी सरकारच्या काळात ८० हजार कोटींचे सामंजस्य करार झाले होते. यंदा दीड लाख



कोटींचे करार झाले, असे राजकारण लगेच सुरू झाले आहे.

अर्थातच, सध्याच्या परिस्थितीत राज्यात दीड लाख कोटींचे सामंजस्य करार झाले, याचे स्वागतच करायला हवे. या करारांनंतर भारतातीलच वा अगदी महाराष्ट्रातीलच कंपन्यांशी राज्य सरकारने करार केल्याबद्दल टीका सुरू झाली. काही कंपन्या या राज्यातील होत्या, मग त्यांच्याशी दावोस येथे कशाला अगदी मंत्रालयात करार करता आले असते ही टीका विरोधकांनी केली. महाराष्ट्रात कंपनी असलेल्या एका उद्योजकाने केलेल्या कराराएवढी कंपनीची सध्या वार्षिक उलाढालही नाही. असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यावर, दीड लाख कोटींचे गुंतवणुकीचे करार झाल्यानेच विरोधकांच्या पोटात दुखत असल्याचे राजकीय धाटणीचे उत्तर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले आहे. पण या वादातून मूळ मुद्दा बाजूलाच राहतो.

सामंजस्य करार आणि प्रत्यक्ष गुंतवणूक होणे यात बराच फरक असतो. प्रत्यक्ष होणारे करार आणि प्रत्यक्ष गुंतवणूक याचे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास किंवा त्यापेक्षा कमीही असते.

गुंतवणूक करणारा व्यावसायिक अर्थकारणावर भर देणार हे ओघानेच आले. सामंजस्य करार केला तरी अन्यत्र त्याला अधिक सोयीसुविधा मिळणार असल्यास तेथे गुंतवणूक करण्याची संधी उद्योजक का सोडेल? शेवटी उद्योजक फायदातोटा बघणारच. उद्योजकांना राज्याचे आकर्षण वाटले पाहिजे, त्यांना व्यवसाय करणे सुलभ व्हावे, चांगल्या पायाभूत सोयीसुविधा, पाणी- वीज मिळेल याची जबाबदारी राज्याची असते.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गद्दारांना मतदार जागा दाखवेल!

## अजित पवार यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेवर निशाणा? 32 वर्षांच्या काळात अनेक स्थित्यंतरे बघितली

। परभणी । महाईन्यूज ।

**गेल्यावेळी उद्धव ठाकरे यांचे उमेदवार या नात्यानं लोकांनी निवडून दिलं होतं. शिंदे यांनी बंड केला. असं करता येत नाही. पण, चेंडू आता सर्वोच्च न्यायालयात आहे. दुसरा निवडणूक आयोगाच्या समोर आहे. हा निकाल देशाच्या सर्व निकालावर परिणाम टाकणारा राहणार आहे. यात काही घडलं तर देशात कायमची अस्थिरता राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असं भाकित विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी व्यक्त केलं. अजित पवार परभणी येथे बोलताना म्हणाले, पन्नास खोके एकदम ओके ही घोषणा खूप गाजली. लोकं आम्हाला याबद्दल विचारायला लागले. अशी पद्धती लोकांना आवडत नाही. त्यामुळं लोकं वाट पाहत आहेत की, कधी निवडणुका लागतात.**

### अशांना मतदार जागा दाखवेल

ज्यांनी गद्दारी केली, वेगळी भूमिका घेतली. त्यांची जागा दाखविण्यासाठी मतदार सज्ज आहेत. आता काही ठिकाणी निवडणुकीवर



परिणाम व्हायला लागला, असंही अजित पवार यांनी सांगितलं.

यावेळी बोलताना अजित पवार यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला. यापूर्वी पक्ष सोडून जाणाऱ्यांना निवडणुकीत मोठ्या फरकाने पराभूत व्हावे लागले. त्यामुळं निवडणुका झाल्यास लोकं योग्य ते उमेदवार निवडून देतील, असं मत अजित पवार यांनी व्यक्त केलं.

### म्हणून महत्त्वाचे काही निर्णय घेता आले नाही

» आम्ही महाविकास आघाडीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात काम करत असताना कोरोनाचं सावट होतं. प्रत्येक माणसाचा जीव वाचविणं ही प्राथमिकता होती. ही बाब लक्ष्यात घ्या. त्यामुळं काही महत्त्वाचे निर्णय घेता आले नाही, अशी खंतही अजित पवार यांनी व्यक्त केली. पण, आमचं सरकार राहिलं असतं तर त्यांना प्राथमिकता दिली असती, असंही त्यांनी म्हंटलं.

### अनेक स्थितंतरे पाहिलीत

» अजित पवार यांनी सांगितलं की, मी गेल्या ३२ वर्षांच्या काळात अनेक स्थितंतर पाहिली. अनेक मुख्यमंत्री पाहिलेत. विक्रम काळे यांना गेली काही वर्षे ओळखतोय. वसंतराव काळे यांच्यानंतर अकस्मितरीत्या विक्रम काळे यांच्यावर जबाबदारी आली.

# महावितरणची रेकॉर्ड ब्रेक ३७ टक्के दरवाढीची मागणी

## आगामी दोन वर्षांमध्ये 67,644 कोटी रुपये तूट भरपाईची मागणी

। मुंबई। महाईन्यूज ।


**संपूर्ण राज्यात महावितरण कंपनीने रेकॉर्ड ब्रेक दरवाढीची मागणी केलेली आहे. महावितरणने दाखल केलेल्या याचिकेत ३७ टक्के दरवाढीची मागणी केली आहे. या याचिकेमध्ये आगामी दोन वर्षांमध्ये ६७,६४४ कोटी रुपये तूट भरपाईची मागणी करण्यात आलेली आहे.**

एकूण दोन वर्षांचा हिशोब करता ही मागणी म्हणजे दरवाढ सरासरी २.५५ रु. प्रति युनिट इतकी म्हणजे सरासरी ३७% दरवाढीची आहे. वीज ग्राहक संघटनांनी या दरवाढीला विरोध केला आहे. तसेच ग्राहक आणि संघटनांनी या प्रकरणात हरकत दाखल करण्याचीही मागणी या याचिकेच्या निमित्ताने होत आहे.

स्थिर वा मागणी आकार, वीज आकार व वहन आकार या तिन्ही आकारांत वाढीची मागणी असून एकूण परिणामी वाढ सरासरी २.५५ रु. प्रति युनिट आहे. दरवाढीच्या प्रमाणात इलेक्ट्रिसिटी ड्यूटी रकमेचा अतिरिक्त बोजा ग्राहकांवर पडणार तो वेगळाच आहे. इतकी प्रचंड मागणी आयोग स्थापन झाल्यापासून गेल्या २३ वर्षांत प्रथमच करण्यात आलेली आहे. सर्वसामान्य ग्राहकांना शॉक देणारी, येऊ घातलेल्या उद्योगांना रोखणारी व असलेल्या उद्योगांना राज्याबाहेर ढकलणारी आहे. त्यामुळेच सर्व वीज ग्राहक व विविध औद्योगिक, शेतकरी, रहिवासी व ग्राहक संघटनांनी विरोध करावा आणि प्रचंड प्रमाणात हरकती नोंद कराव्यात" असे जाहीर आवाहन महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी केले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ३० मार्च २०२० रोजी मार्च २०२५ अखेरपर्यंतच्या पाच वर्षासाठी बहुवर्षीय वीजदरनिश्चिती आदेश जाहीर केला आहे. तथापि कायद्यातील तरतुदीनुसार तिसऱ्या वर्षी या कंपन्यांना फेर आढावा याचिका दाखल करता येते. त्यानुसार महानिर्मिती आणि महापारेषण या दोन कंपन्यांच्या फेर आढावा याचिकांनंतर आता महावितरण कंपनीची याचिका दाखल व प्रसिद्ध झालेली आहे.

३० मार्च २०२० च्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार इ.स. २०२२-२३ सालासाठी आयोगाने सरासरी वीज देयक दर ७.२७ रु. प्रति युनिट या दरास मान्यता दिलेली आहे. तथापि इंधन समायोजन आकार गृहीत धरून हा सध्याचा सरासरी देयक दर ७.७९ रु. प्रति युनिट दाखविण्यात आला आहे.



### सर्वसामान्य ग्राहकांना शॉक

**» स्थिर वा मागणी आकार, वीज आकार व वहन आकार या तिन्ही आकारांत वाढीची मागणी असून एकूण परिणामी वाढ सरासरी २.५५ रु. प्रति युनिट आहे. दरवाढीच्या प्रमाणात इलेक्ट्रिसिटी ड्यूटी रकमेचा अतिरिक्त बोजा ग्राहकांवर पडणार तो वेगळाच आहे. इतकी प्रचंड मागणी आयोग स्थापन झाल्यापासून गेल्या २३ वर्षांत प्रथमच करण्यात आलेली आहे.सर्वसामान्य ग्राहकांना शॉक देणारी, येऊ घातलेल्या उद्योगांना रोखणारी व असलेल्या उद्योगांना राज्याबाहेर ढकलणारी आहे. त्यामुळेच सर्व वीज ग्राहक व विविध औद्योगिक, शेतकरी, रहिवासी व ग्राहक संघटनांनी विरोध करावा आणि प्रचंड प्रमाणात हरकती नोंद कराव्यात" असे जाहीर आवाहन महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी केले आहे.**

# एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारचा मोठा दिलासा

## संपकाळात मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी देण्याची निर्णय

। नाशिक । महाईन्यूज ।



एसटी संपकाळातील कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. संपकाळात मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना त्यांच्या जागी नोकरी देण्याची निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. संप काळात १२४ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. ज्या कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आता त्यांच्या जागी वारसांना नोकरी देण्यात येणार आहे.

एसटी कर्मचाऱ्यांनी २७ ऑक्टोबर २०२१ पासून काम बंद आंदोलन सुरू केले होते. मार्च २०२२मध्ये न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर कर्मचाऱ्यांनी कामावर येण्यास सुरुवात केली. संपकाळात पगाराविना आर्थिक संकटापुढे टिकाव न धरू शकलेल्या १२४ अधिक कर्मचाऱ्यांनी आत्महत्या करत आपले जीवन संपवले होते.

या संपामुळे एसटी महामंडळाचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले होते. जवळपास चार महिने एसटी सेवा ठप्प होती. तरीही एसटी महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करण्याची मागणी मान्य झाली नव्हती.

परंतु, सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात पाच हजार, चार हजार आणि अडीच हजार रुपयांची वाढ केली होती.

### आंदोलनामुळे ठाकरे सरकार कोंडीत सापडले

**» गेल्यावर्षी एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप हा प्रचंड गाजला होता. एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण करावे, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी शेवटपर्यंत लावून धरली होती. त्यासाठी एसटी कर्मचारी जवळपास सहा महिने मुंबईच्या आझाद मैदानावर ठाण मांडून बसले होते. या काळात विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी आणि गुणरत्न सदावर्ते यांनी या आंदोलनाचे नेतृत्त्व केले होते. एसटी कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे ठाकरे सरकार कोंडीत सापडले होते.**

# हवेत उडणार भारतीय सैनिक!

## आधुनिक ड्रोनमुळे वाढणार भारतीय लष्कराची ताकद, प्राणी नव्हे, तर रोबोट उचलणार सामान

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**भारतीय लष्कराने संवेदनशील सीमा भागात पाळत ठेवण्यासाठी आणि लढाऊ क्षमता मजबूत करण्यासाठी 130 प्रगत ड्रोन यंत्रणा खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अधिकाऱ्यांनी मंगळवारी ही माहिती दिली. ते म्हणाले की बाय-इंडियन श्रेणीतील फास्ट-ट्रॅक प्रक्रियेअंतर्गत आणीबाणीच्या खरेदी अंतर्गत बनवलेले ड्रोन खरेदी केले जात आहेत. या श्रेणी अंतर्गत, सैन्याने आपत्कालीन खरेदी अंतर्गत 48 जेट पॅक सूट खरेदी करण्यासाठी इच्छुक युनिट्सकडून पत्रांसाठी विनंती (RFP) मागितली आहे.**



टेथर्ड ड्रोन सिस्टीममध्ये ड्रोन असतात, जे जमिनीवर टिथर स्टेशनशी जोडलेले असतात आणि व्हिज्युअल श्रेणीच्या पलीकडे लक्ष्यांचे दीर्घकालीन पाळत ठेवू शकतात. अधिकाऱ्यांनी सांगितले की प्रत्येक ड्रोन प्रणालीमध्ये दोन हवाई वाहने, एकल-व्यक्ती पोर्टेबल ग्राउंड कंट्रोल स्टेशन, एक टिथर स्टेशन, एक रिमोट व्हिडिओ टर्मिनल आणि समाविष्ट पेलोडसह इतर घटक असतील. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख 14 फेब्रुवारी आहे. लष्कराने सामानासह 100 रोबोटिक खेचरांची प्रक्रियाही सुरू केली आहे. 6 फेब्रुवारी ही निविदा सादर करण्याची अंतिम तारीख असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### ड्रोन मायदेशी लँड करण्यास सक्षम

त्यात असेही नमूद केले आहे की संवादामध्ये बिघाड झाल्यास किंवा वायर तुटल्यास आणि बॅटरी कमी झाल्यास ड्रोन घरी परत येऊ शकेल. ड्रोन प्रणाली टिथर स्टेशनसह येईल, जी वीज पुरवठा केबल आणि डेटा लिंक म्हणून काम करेल. एका अधिकाऱ्याने सांगितले की, विस्तारित कालावधीत पाळत ठेवण्याची क्षमता वाढल्यामुळे या ड्रोनचा लष्कराच्या यादीतील इतरांपेक्षा फायदा होईल. अधिकाऱ्याने स्पष्ट केले की सतत पाळत ठेवण्यासाठी लांब उड्डाण कालावधी, अगदी दृष्टीच्या पलीकडे असलेल्या लक्ष्यांवर, जॅमिंगच्या कमी जोखमीसह, अचूक इंटेल आणि लक्ष्य संपादन करण्यात सैन्याला मदत होईल.

### लष्कराला मिळणार हे ड्रोन

गेल्या एका वर्षात, लष्कराने शत्रूच्या ड्रोनवर कारवाई करण्यासाठी काउंटर-ड्रोन प्रणालीसह टेहळणीसाठी अनेक स्वदेशी ड्रोन मिळविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यामध्ये स्विच ड्रोन, स्वॉर्म ड्रोन, हाय अल्टीट्यूड लॉजिस्टिक ड्रोन, मिनी रिमोटली पायलटेड एअरक्राफ्ट आणि रिमोटली पायलटेड एरियल व्हेइकल्स, सर्व्हिलन्स कॉप्टर्स, हेरॉन मिडियम-अल्टीट्यूड लाँग-एन्ड्युरन्स मानवरहित एरियल व्हेइकल्स (यूएव्ही), लोइटरिंग-अवलंबित युद्धसामग्री, आरपीएएस यांचा समावेश आहे. एकूण, लष्कराला सुमारे 2,000 ड्रोन मिळतील.

### 'बाय इंडिया' श्रेणी अंतर्गत केली जाईल खरेदी.

**मंगळवारी जारी केलेल्या प्रस्तावाच्या RFP मध्ये, लष्कराने सांगितले की, प्रत्येक ड्रोन प्रणालीमध्ये एकत्रित इलेक्ट्रो-ऑप्टिक/इन्फ्रारेड पेलोडसह दोन हवाई वाहने, एक रिमोट व्हिडिओ टर्मिनल आणि जनरेटर सेट, एक बॅटरी चार्जर, प्रत्येक ड्रोनसाठी एक अतिरिक्त बॅटरी आणि एक अतिरिक्त बॅटरी समाविष्ट असेल. सिस्टममध्ये किमान 60 टक्के स्वदेशी सामग्री असणे आवश्यक आहे आणि ती 'बाय इंडिया' श्रेणी अंतर्गत खरेदी केली जाईल.**

### 10 मिनिटांत तैनात करण्याची क्षमता

**त्यांचे वजन सुमारे 15 किलो असावे आणि ते टेथर्ड मोडमध्ये सहा तास आणि अनटिथर्ड मोडमध्ये 45 मिनिटे सहन करण्यास सक्षम असावे आणि 10 मिनिटांत तैनात करण्यात सक्षम असावे. RFP नुसार, त्याची मिशन रेंज अनियंत्रित मोडमध्ये 5 किमी पेक्षा कमी एकमार्गी असावी आणि समुद्रसपाटीपासून 4,500 मीटर उंचीवर प्रक्षेपित करण्यास आणि 500 मीटर उंचीवर उड्डाण करण्यास सक्षम असावे.**

### चार पायांचे रोबोटिक खेचर

आरएफपीमध्ये, लष्कराने सांगितले की रोबोटिक खेचर चतुष्पाद असावे, वेगवेगळ्या भूभागावर चालण्यास सक्षम असावे. याशिवाय, स्वतःला बरे करण्याची क्षमता असावी. असे म्हटले आहे की रोबोट असमान भूभागावर चालण्यास सक्षम असावा आणि मध्यम चढणे आणि पडणे आणि त्याचे वजन 60 किलोपेक्षा जास्त नसावे. RFP म्हणते की ते संमिश्र किंवा इतर मजबूत सामग्रीचे बनलेले असावे आणि स्वायत्त मोडमध्ये आणि GPS-नकारलेल्या वातावरणात 3,000 मीटर उंचीपर्यंत कार्य करण्यास सक्षम असावे.

### पायऱ्या चढण्यास सक्षम

त्यांना किमान पाच इंच उंचीच्या पायऱ्या चढता आल्या पाहिजेत आणि असंरचित भूप्रदेश, बिल्ट-अप भागात मार्गक्रमण करता आले पाहिजे आणि त्यांचे शेल्फ लाइफ 10 वर्षे असावे, असे RFP म्हणते.

# सिंधू कराराबाबत पाकिस्तानला नोटीस

।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

सिंधू नदी पाणी वाटपाबाबतच्या करारामध्ये सुधारणा करण्यासाठी भारताने पाकिस्तानला नोटीस बजावली आहे. पाकिस्तानच्या उपद्व्यापांचा या करारावर झालेला विपरीत परिणाम पाहता दुरुस्तीसाठी नोटीस जारी करणे भारताला भाग पडले आहे, असे सरकारच्या उच्च सूत्रांकडून सांगण्यात आले. बुधवारी (ता. २५) ही नोटीस देण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तानदरम्यान सिंधू नदीच्या पाणी वाटपाबाबत सप्टेंबर १९६० मध्ये करार झाला होता. यातील तरतुदींनुसार सिंधू खोऱ्यातील सहा नद्यांच्या पाण्याच्या वाटणीवर दोन्ही देशांमध्ये सिंधू आयुक्तालय आणि कायमस्वरूपी सिंधू आयोग आहे.



भारत आणि पाकिस्तान यांच्यात "सिंधू जल करार" आहे, पण पाकिस्तानला भारतातील नद्यांमधून मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पाणी मिळते. या करारामध्ये आता सुधारणेसाठी भारताने नोटीस बजावली आहे. संबंधित आयुक्तांमार्फत पाकिस्तानला २५ जानेवारीला नोटीस देण्यात आली आहे. याबाबत सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानसोबत सिंधू जल कराराच्या अंमलबजावणीसाठी भारत जबाबदार भागीदार आहे. परंतु पाकिस्तानच्या कृतीचा सिंधू जल कराराच्या तरतुदींवर विपरित परिणाम झाला आहे.

# मोदी गुरुजींची शाळा! एकनाथ शिंदे-फडणवीसांची वर्गात हजेरी

## 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. परीक्षेच्या वेळात तणावाचा सामना करण्यासाठी नरेंद्र मोदींनी विद्यार्थ्यांना सल्ला दिला. तणाव आणि परीक्षेची भीती दूर करण्यासाठी या संवादात्मक सत्रादरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. दिल्लीतील तालकटोरा इनडोअर स्टेडियमवर हा कार्यक्रम झाला.**



'परीक्षा पे चर्चा-२०२३' या कार्यक्रमात देशभरातील विद्यार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वैयक्तिकरित्या भेटण्याची संधी मिळाली. विविध राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सुमारे २०० विद्यार्थी या कार्यक्रमाला हजर होते. नरेंद्र मोदी म्हणाले की, तुम्ही चांगले काम केले तर आणखी चांगले काम करण्याचा दबाव वाढतो. मी राजकारणात आहे, प्रत्येक वेळी मागच्या वेळेपेक्षा जास्त जागा मिळवण्याचा माझ्यावर दबाव असतो. मात्र हजारोंच्या गर्दीतही फलंदाज लक्ष केंद्रित करतो. तो प्रेक्षकांच्या मागणीकडे लक्ष देत नाही आणि चेंडू पाहून त्यानुसार शॉट खेळतो, असे उदाहरण नरेंद्र मोदी यांनी एका विद्यार्थ्याच्या प्रश्नाला दिले. नरेंद्र मोदी म्हणाले, करोडो विद्यार्थी माझी परीक्षा घेतात आणि त्यामुळे मला आनंद होतो.

देशातील तरुण मन काय विचार करतात हे पाहणे माझे सौभाग्य आहे. कुटुंबांमध्ये मुलांकडून अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. पण जर कुटुंबातील सदस्य केवळ त्यांच्या सामाजिक स्थितीवर आशा ठेवत असतील, तर ती चिंतेची बाब आहे. तुम्ही चांगले काम करत असाल तर प्रत्येकाला तुमच्याकडून मोठ्या अपेक्षा असतील. मी राजकारणात आहे आणि माझ्या बाबतीतही असेच घडते.

# कंगनाचा सूर पुन्हा एकदा बदलला



अभिनेत्री कंगना राणावतने निर्विकारपणे आपले मत व्यक्त केले. कंगना अनेकवेळा फिल्म इंडस्ट्रीवर टीका करताना दिसली आहे. अलीकडेच कंगनाने ट्विटरवर पुनरागमन केले आहे, त्यानंतर तिने शाहरुख खानच्या पठाण चित्रपटाबाबत अनेक ट्विट केले आहेत. कालपर्यंत 'पठाण'चे गुणगान करणाऱ्या कंगनाचा सूर पुन्हा एकदा बदलला आहे. आता कंगनाने पठाणला फक्त एक चित्रपट सांगितला आहे आणि येथे फक्त जय श्री रामाचाच जयजयकार होणार असल्याचे सांगितले आहे.

कंगनाने एकामागून एक 3 ट्विट केले आहेत. कंगना म्हणाली- पठाण द्वेषावर प्रेमाचा विजय असल्याचा दावा करणाऱ्यांशी मी सहमत आहे, पण ज्यांचे प्रेम आणि कोणाचा द्वेष. तिकीट कोण खरेदी करत आहे आणि कोण यशस्वी करत आहे हे नीट समजून घेऊया. होय, हे भारताचे प्रेम आहे, जिथे 80 टक्के हिंदू राहतात आणि तरीही चित्रपटाचे नाव पठाण आहे आणि तो यशस्वी होत आहे.

कंगनाने पुढे लिहिले- 'पण जे आशा बाळगून आहेत, त्यांनी लक्षात ठेवा की पठाण हा फक्त एक चित्रपट आहे. येथे फक्त जय श्री रामच गुंजेल. कंगनाने आणखी एका ट्विटमध्ये लिहिले- 'माझा विश्वास आहे की भारतीय मुस्लिम देशभक्त आहेत आणि अफगाण पठाणांपेक्षा खूप वेगळे आहेत... सार हा आहे की भारत कधीच अफगाणिस्तान होणार नाही, अफगाणिस्तानमध्ये काय चालले आहे ते आपल्या सर्वांना माहीत आहे. तिथली परिस्थिती नरकाच्या पलीकडे आहे. 'पठाण' हे चित्रपटाचे योग्य नाव आहे. तो भारतीय पठाण आहे.

नुकतेच अभिनेत्री कंगना राणावतने तिच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या रॅप-अप पार्टीदरम्यान 'पठाण' चित्रपटाचे कौतुक केले होते. कंगना म्हणाली होती- 'पठाण चांगली कामगिरी करत आहे. असे चित्रपट चालले पाहिजेत. मला वाटते की प्रत्येकजण आपापल्या स्तरावर कठोर परिश्रम करत आहे ' विशेष म्हणजे, कंगना लवकरच इमर्जन्सी आणि तेजस या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.


## ऑस्कर 2023 च्या शर्यतीत जॅकलीन फर्नांडिसच्या चित्रपटातील गाण्याची नाटू-नाटूशी स्पर्धा

अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस सध्या सुकेश चंद्रशेखर मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात चर्चेत आहे, मात्र आता जॅकलीन ऑस्कर 2023 च्या निमित्ताने चर्चेत आली आहे. होय, जॅकलिनच्या चित्रपटाला ऑस्करसाठी नामांकन मिळाले आहे. अभिनेत्रीने बुधवारी तिच्या टेल इट लाइक अ वुमन चित्रपटाच्या टीमचे अभिनंदन केले. या चित्रपटातील अ‍ॅप्लॉज या गाण्याला अकादमी पुरस्काराच्या सर्वोत्कृष्ट मूळ गाण्यासाठी नामांकन मिळाले आहे. ज्यासाठी जॅकलिनसह संपूर्ण टीम खूप खुश आहे.

या कामगिरीबद्दल जॅकलिनने चित्रपटाच्या दिग्दर्शकांचे अभिनंदन आणि आभार मानले आहेत. टेल इट लाइक अ वुमन या चित्रपटाचे दिग्दर्शन लीना यादव, मारिया सोल टोगनाजी, लुसिया पुएन्झो, सिल्व्हिया कोरोबिओ, ताराजी पी. हेन्सन, मिपो ओह आणि कॅथरीन हार्डविक यांनी केले आहे. या चित्रपटात जॅकलीनचीही भूमिका आहे. हा एक इटालियन-अमेरिकन चित्रपट आहे. ज्याचे APPLAUSE हे गाणे सोफिया कार्सनने सादर केले आहे.

जॅकलिनने इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली ज्यामध्ये तिने लिहिले की, माझ्याकडे शब्द नाहीत, मी डियान वॅरेन आणि सोफिया कार्सनचे अभिनंदन करतो की अ‍ॅप्लॉज हे गाणे ऑस्कर 2023 साठी नामांकन झाले आहे. मला तुमचा अभिमान आहे. तुमच्या या सुंदर चित्रपटाशी जोडले जाणे ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यातही खूप चांगले कलाकार आहेत. धन्यवाद. जॅकलीनने पुढे लिहिले, मी RRR च्या नाटू-नाटू नामांकनाचे देखील अभिनंदन करते आणि त्यांच्या संपूर्ण टीमला शुभेच्छा देते.

आता ऑस्कर 2023 च्या शर्यतीत SS राजामौली यांच्या 'RRR' चित्रपटातील 'नातू नातू' हे गाणे आणि जॅकलिनच्या चित्रपटातील 'टाळ्या' हे गाणे ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात एकमेकांशी भिडणार आहेत. RRR चित्रपटातील 'नातू नातू' या गाण्याला गोल्डन ग्लोबल अवॉर्ड मिळाला आहे. याशिवाय या गाण्याला सर्वोत्कृष्ट समीक्षक निवडीचा पुरस्कारही मिळाला आहे.



## उर्फीने बिकिनीच्या नावावर घातली विचित्र वस्तू

प्रसिद्ध अभिनेत्री उर्फी जावेद जिच्या एका कटाक्षामागे जग वेडे आणि आश्चर्यचकितही होते. उर्फीने पुन्हा एकदा तसे करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. ती अलीकडेच एका सार्वजनिक ठिकाणी दिसली आणि यावेळी देखील तिने लोकांचे लक्ष तिच्याकडे आकर्षित केले. उर्फी ऑल ब्लॅक लूकमध्ये सुंदर दिसत होती, पण बिकिनी लूकने सगळी लाइमलाइट काढून घेतली.



यादरम्यान ती बिकिनीच्या नावाने काहीतरी विचित्र परिधान करून आली आणि आकर्षणाचे केंद्र बनली.

कोणाच्या नजरेत कसं यायचं किंवा लोकांचं लक्ष कसं आकर्षित करायचं हे उर्फी जावेदला चांगलंच माहीत आहे. अलीकडेच ती एका रेस्टॉरंटच्या बाहेर दिसली आणि तिला पाहताच लोकांनी तिचे फोटो काढायला सुरुवात केली. उर्फीने ऑल ब्लॅक लूक घातला होता. तिने काळ्या रंगाचा स्कर्ट घातला होता आणि सोबत काळ्या रंगाची बिकिनी घातली होती. तिचा लुक पूर्ण करण्यासाठी तिने तिचे केस बांधले होते आणि दागिन्यांच्या नावावर फक्त कानातले घातले होते. उर्फीचा हा लूक खूपच वेगळा आहे. आता उर्फीचा नवा लूक समोर आला असून ती ट्रोल होऊ लागली आहे.

या नव्या लूकसाठी लोकांनी उर्फी जावेदला ट्रोल केले आहे. एका यूजरने म्हटले की, तिचा लूक पाहून मला चक्कर येत आहे, तर एकाने लिहिले की, काही लोकांना उर्फीच्या फॅशनचा हेवा वाटतो. उर्फी जावेदने काय परिधान केले आहे, असे अनेक लोक कमेंट बॉक्समध्ये विचारत आहेत. एकाने तर लिहिलं की, तिचा लूक पाहून मला हसू आलं. उर्फीला दरवेळेप्रमाणे ट्रोल केले जात आहे,



## बाबो! 3 मिनिटांच्या आयटम साँगसाठी उर्वशीनं घेतलेली फी ऐकून चक्रावेल डोके..



बॉलिवूडनंतर उर्वशीने आता साउथ सिनेसृष्टीमध्ये पाऊल टाकलं आहे. उर्वशीने कन्नड सिनेमांमध्ये काम केलंय. उर्वशीने चिरंजीवी यांच्या 'वाल्टेयर वीरय्या' या सिनेमातून तामिळ सिनेसृष्टीत पाऊल टाकलंय. खरं तर या सिनेमात ती फक्त एका गाण्यात झळकली आहे. या सिनेमात खलनायकाच्या भूमिकेत असलेल्या अभिनेते प्रकाश राज यांच्याहून जास्त फी उर्वशीने घेतली आहे. ३ मिनिटांच्या या गाण्यासाठी उर्वशीने तब्बल २ कोटी रुपये घेतले आहेत. तर खलनायकाच्या भूमिकेसाठी प्रकाश राज यांची फी ही दीड कोटी इतकी आहे.

# हार्दिक ब्रिगेड सपशेल अपयशी!

## पहिल्या टी20 सामन्यात न्यूझीलंडचा भारतावर 21 धावांनी विजय

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि न्यूझीलंड यांच्या दरम्यानच्या तीन सामन्यांच्या टी२० मालिकेला शुक्रवारी (२७ जानेवारी) सुरुवात झाली. मालिकेतील हा पहिला सामना रांची येथील जेएससीए स्टेडियमवर खेळला गेला. वनडे मालिकेत एकतर्फी पराभूत झालेल्या न्यूझीलंड संघाने या सामन्यात जबरदस्त पुनरागमन केले. खेळाच्या तिन्ही प्रकारात भारतीय संघावर वर्चस्व गाजवत न्यूझीलंडने २१ धावांनी मोठा विजय संपादन केला. महेंद्रसिंग धोनीच्या घरातच टीम इंडियाला पराभवाचे तोंड पाहावे लागले. या सामन्यात सामनावीराचा पुरस्कार डॅरिल मिशेलला देण्यात आला.**



पहिल्या टी२० मध्ये न्यूझीलंडने भारतावर २१ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक हारल्यानंतर न्यूझीलंडने २० षटकांत ६ गडी गमावून १७६ धावा केल्या. डेव्हॉन कॉनवेने ५२ आणि डॅरिल मिशेलने नाबाद ५९ धावा केल्या. भारतीय संघ २० षटकात विकेट गमावून केवळ १५५ धावा करू शकला. भारताकडून सूर्यकुमार यादवने ४७ आणि वॉशिंग्टन सुंदरने ५० धावा केल्या. अर्शदीप सिंगने २०व्या षटकात दिलेल्या २७ धावांनी न्यूझीलंडचा आत्मविश्वास उंचावला. त्यानंतर पाहुण्यांच्या फिरकीपटूंनी भारतीय फलंदाजांना पळताभुई थोडी केली. ३ फलंदाज १५ धावांवर माघारी परतले होते आणि 'मिस्टर ३६०' अशी ओळख असणाऱ्या सूर्यकुमार यादव व हार्दिक पांड्या यांनी सामन्यात पकड घेतली होती. पण, ४ चेंडूंनी सामना फिरला अन् त्यानंतर भारताचा डाव गडगडला. वॉशिंग्टन सुंदरने दोन विकेट्ससह अर्धशतकी खेळी करून भारताच्या विजयासाठी पुरेपूर प्रयत्न केला.हार्दिकच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा हा दुसरा पराभव आहे. यापूर्वी संघ श्रीलंकेकडून पराभूत झाला होता. त्याचवेळी, भारतीय संघाला जवळपास १५ महिन्यांनंतर टी२० फॉरमॅटमध्ये न्यूझीलंडकडून पराभव पत्करावा लागला आहे. या सामन्यापूर्वी, ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी भारताला या फॉरमॅटमध्ये किवी संघाकडून शेवटचा पराभव झाला होता. त्यानंतर दुबईत झालेल्या टी२० विश्वचषकात न्यूझीलंडने भारताचा पराभव केला. या सामन्यात सूर्यकुमार आणि सुंदर यांच्याशिवाय भारतीय फलंदाजी फ्लॉप ठरली. सात फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. त्याचवेळी भारतीय गोलंदाजांची कामगिरीही निराशाजनक ठरली. अर्शदीपला चार षटकांत ५१ धावा कुटल्या. उमराननेे एका षटकात १६ धावा, मावीने दोन षटकांत १९ धावा आणि हार्दिकने तीन षटकांत ३३ धावा दिल्या.

तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा हा निर्णयही अयोग्य ठरला न्यूझीलंडने भारतासमोर १७७ धावांचे लक्ष्य दिले होते. २० षटकांत किवी संघाने ६ गडी गमावून १७६ धावा केल्या. या सामन्यात अर्शदीप सिंगने खराब गोलंदाजी केली. त्याने चार षटकात ५१ धावा दिल्या आणि फक्त एक विकेट घेतली. अर्शदीप २०व्या षटकात गोलंदाजीसाठी आला आणि त्याने २७ धावा दिल्या. न्यूझीलंडकडून डॅरिल मिचेलने ३० चेंडूत नाबाद ५९ धावांची सर्वोच्च खेळी खेळली. त्याचे हे टी२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील तिसरे अर्धशतक होते. त्याचवेळी डेव्हॉन कॉनवेने ३६ चेंडूत ५२ धावांची खेळी केली. त्याचे टी२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे नववे अर्धशतक होते.

### अखेर न्यूझीलंड अपयशी...

**पहिल्या टी२० मध्ये न्यूझीलंडने भारतावर २१ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक हारल्यानंतर न्यूझीलंडने २० षटकांत ६ गडी गमावून १७६ धावा केल्या. डेव्हॉन कॉनवेने ५२ आणि डॅरिल मिशेलने नाबाद ५९ धावा केल्या. भारतीय संघ २० षटकात विकेट गमावून केवळ १५५ धावा करू शकला. भारताकडून सूर्यकुमार यादवने ४७ आणि वॉशिंग्टन सुंदरने ५० धावा केल्या. अर्शदीप सिंगने २०व्या षटकात दिलेल्या २७ धावांनी न्यूझीलंडचा आत्मविश्वास उंचावला. त्यानंतर पाहुण्यांच्या फिरकीपटूंनी भारतीय फलंदाजांना पळताभुई थोडी केली. ३ फलंदाज १५ धावांवर माघारी परतले होते आणि 'मिस्टर ३६०' अशी ओळख असणाऱ्या सूर्यकुमार यादव व हार्दिक पांड्या यांनी सामन्यात पकड घेतली होती.**

# अंडर-19 विश्वचषकाने या भारतीय मुलीला बनवले स्टार

## आतापर्यंत सर्वाधिक धावा, लिलावात देणार दिग्गजांना टक्कर

।भुवनेश्वर।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय ज्युनियर महिला संघाने दक्षिण आफ्रिकेत खेळल्या जात असलेल्या पहिल्या अंडर-19 टी-20 विश्वचषकात शुक्रवारी न्यूझीलंडचा आठ विकेट्स राखून पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आणि भारताच्या विजयात, श्वेता सेहरावत पुन्हा एकदा चमकली, तिने 45 चेंडूत 10 चौकारांसह 61 धावांची खेळी केली. या खेळीने भारतीय संघाला महिला क्रिकेटमध्ये आणखी एक स्टार मिळणार असल्याचे या 18 वर्षीय तरुणीमुळे स्पष्ट झाले आहे.



न्यूझीलंडकडून मिळालेल्या 108 धावांच्या सोप्या लक्ष्याचा पाठलाग करताना, जिथे स्टार खेळाडू आणि वरिष्ठ संघाची कर्णधार शफाली वर्मा केवळ 10 धावा करून बाद झाली, तेव्हा श्वेता सेहरावतने एका टोकाला पेग पुरून विजय मिळवला. न्यूझीलंडविरुद्धच्या उपांत्य फेरीत तिच्या नाबाद खेळीमुळे श्वेता सध्या सुरू असलेल्या अंडर-19 विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारी खेळाडू बनली आहे. श्वेताने आतापर्यंत 6 सामन्यांच्या 3 डावांमध्ये 3 अर्धशतकांसह 292 धावा केल्या आहेत.


नाबाद 92 ही तिची सर्वोत्तम धावसंख्या आहे. विशेष बाब म्हणजे श्वेता सहापैकी चार डावात नाबाद राहिली आहे. आता अंतिम सामना खेळायचा बाकी असताना श्वेता केवळ तीनशेचा टप्पा ओलांडणार नाही, तर ती प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचीही प्रबळ दावेदार आहे. मात्र, या कामगिरीचा मोठा परिणाम काही दिवसांनी होणाऱ्या महिला लीगसाठी खेळाडूंच्या लिलावात नक्कीच पाहायला मिळेल. श्वेता सेहरावतसाठी पाच फ्रँचायझींमध्ये चांगलीच चुरस पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

# ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी रवींद्र जडेजाचे दमदार कमबॅक

## जादुई फिरकीने फलंदाजांच्या दांड्या गुल

।मुंबई । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

टीम इंडियाचा स्टार अष्टपैलू रवींद्र जडेजाने धुमाकूळ घातला आहे. रणजी ट्रॉफीच्या चालू मोसमात फिटनेस सिद्ध करण्यासाठी आलेला जडेजा सौराष्ट्राचा कर्णधार म्हणून खेळत आहे. तामिळनाडूविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या सामन्यात त्याने आपल्या गोलंदाजीने धुमाकूळ घातला. तिसऱ्या दिवशी तिसऱ्या सत्रापर्यंत जडेजाने १७.१ षटकांत ५३ धावांत ७ बळी घेतले. त्याने शानदार गोलंदाजी करताना ३ निर्धाव षटकेही टाकली. जडेजाच्या गोलंदाजीसमोर शाहरुख खान, बाबा इंद्रजित आणि कर्णधार प्रदोष पॉल हे तामिळनाडूचे फलंदाज गारद झाले. जडेजाने शाहरुख खानला २ धावांवर, तर



बाबा इंद्रजित २८ धावांवर बोल्ड झाला. जडेजाच्या धारदार गोलंदाजीने कर्णधार प्रदोष पॉलला एलबीडब्ल्यू करून तंबूचा रस्ता दाखवला. यानंतर विजय शंकर १०, अजित राम ७, मणिमरन सिद्धार्थ १७ आणि संदीप वॉरियर ४ धावांवर बाद झाल्याने खळबळ उडाली. जडेजाने असे न कळणारे चेंडू टाकले की फलंदाज केवळ ॲक्शन मोडमध्येच राहिले आणि बेल्स उडून गेले.याआधी पहिल्या डावात स्टार अष्टपैलू खेळाडूने एक विकेट घेतली होती. जडेजाने बाबा इंद्रजितला ६६ धावांवर तंबूचा रस्ता दाखवला.